MHYA020020042022

सादर केले - ११/१०/२०२२
नोंदणी केले - ११/१०/२०२२
निर्णय दिला - १४/०८/२०२४
कालावधी - ०१व-१०म-०३दि

**<u>सह दिवाणी न्यायालय (वरीष्ठ स्तर), यवतमाळ.</u>**
(पिठासीन अधिकारीः जी.आर.कोलते)

**<u>हिंदू विवाह याचीका क्रमांक.११७/२०२२</u>** **<u>निशाणी १३</u>**

**संदिप प्रकाश राऊत,**
वय अं. २६ वर्ष, व्यवसाय- मजुरी,
रा. अंतरगाव (चिखली), ता.राळेगाव,
जि. यवतमाळ. .... **<u>याचिकाकर्ता</u>**

**- विरुध्द -**

**सौ. प्रिया संदिप राऊत,**
वय अं. २३ वर्ष, व्यवसाय- मजुरी,
रा. द्वारा- किसनाजी पाचभाई,
किन्ही जवादे, ता. राळेगाव,
जि. यवतमाळ .... **<u>उत्तरवादी</u>**

**<u>हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम ९ अन्वये वैवाहिक सहजिवनाच्या पुनर्स्थापनेबाबत</u>**

याचिकाकर्त्या तर्फे विधीज्ञ - श्री.पी.के.वर्मा
उत्तरवादी एकतर्फा

**<u>न्या य नि र्ण य</u>**
(पारित दि.१४/०८/२०२४)

सदरची याचिका हिंदू विवाह कायदा कलम ९ अंतर्गत वैवाहिक सहजिवनाच्या पुनर्स्थापनेबाबत दाखल करण्यात आली.

०२. याचीकेतील आवश्यक कथन असे की, याचीकाकर्ता व उत्तरवादी यांचा विवाह दिनांक २५/०४/२०२१ रोजी मौजा किन्ही जवादे येथे हिंदू विवाह कायदा व त्यांच्या धर्मातील चालीरीती प्रमाणे संपन्न झाला. विवाहाच्या वेळी याचिकाकर्ता याच्या कुटुंबियांनी आंदण, भेटवस्तु, सोनेनाणे व इतर खर्च केला. विवाहानंतर काही दिवसातच उत्तरवादी हीने अरेरावी करणे, सासु सास-यांसोबत भांडण करणे, आईवडिलांसोबत तासनतास फोनवर बोलणे, घरातील कामांकडे दुर्लक्ष करणे सुरु केले. बरेचदा उत्तरवादी काहीही न सांगता माहेरी निघुन जायची. अशा परिस्थितीत सुध्दा याचिकाकर्ता उत्तरवादीसोबत संसार करीत होता. दि.०६/०३/२०२२ रोजी उत्तरवादी ही आईवडिलांच्या सांगण्यावरुन व भडकावण्यावरुन माहेरी निघुन गेली. त्यानंतर याचिकाकर्ता व त्याच्या कुटुंबियांनी तिला नांदविण्याकरीता अनेक प्रयत्न केले. परंतु तिने नेहमीच टाळाटाळ केली. याचिकाकर्ताचे उत्तरवादीवर प्रेम असल्यामुळे तिच्यासोबत संसार करण्याची त्याची मनापासुन ईच्छा आहे. उत्तरवादी ही कोणत्याही सबळ कारणाशिवाय वेगळी राहुन याचिकाकर्ता याला वैवाहीक जिवनापासुन वंचित ठेवत आहे. याचिकाकर्ता व त्याच्या कुटुंबियांनी उत्तरवादीला नांदविण्याकरीता अनेक वेळा प्रयत्न केले. शेवटी त्यांनी दि.२७/०९/२०२२ रोजी वकीलांमार्फत नांदविण्याबाबत नोटीस पाठविली. परंतु सदर नोटीसला उत्तरवादीने कोणतेही उत्तर दिले नाही. उत्तरवादीने याचिकाकर्ता याला त्रास देण्याच्या उद्देशाने राळेगाव न्यायालयात खावटीचे प्रकरण दाखल केले आहे. वास्तविकतः याचिकाकर्ता व त्याच्या कुटुंबियांनी नेहमीच उत्तरवादी हीला प्रेमाची, आपुलकीची व आदराची वागणुक दिली आहे. करीता याचिकाकर्ता यास उत्तरवादीसोबत संसार करावयाचा असल्यामुळे तिने त्याच्याकडे नांदण्यास येण्याकरीता सदर याचिका दाखल केली आहे.

०३. याचीकाकर्त्याने दाखल केलेल्या याचिकेची नोटीस नि.क्र.०५ प्रमाणे उत्तरवादीवर तामील झाली परंतु ती हजर झाली नाही. त्यामुळे दिनांक ०५/०९/२०२३ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारित करून तिच्या विरूध्द प्रस्तुत याचिका एकतर्फा

चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

०४. याचीकाकर्ताच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०५. याचीकाकर्त्याचा याचिकेमधील पुरावा व युक्तीवाद लक्षात घेता खालील मुद्दे निष्कर्षासह घेतले आहेत, ते येणेप्रमाणेः-

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | याचीकाकर्ता हे सिध्द करतो काय की, लग्नानंतर उत्तरवादीने कोणतेही संयुक्तीक कारण नसताना त्यांच्या संसारातून माघार घेतली(withdrawn from the society from other)? | होय. |
| २. | याचीकाकर्ता उत्तरवादीविरुध्द वैवाहीक संबध पुनर्स्थापनेचा हुकूमनामा मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |
| ३. | काय आदेश ? | अर्ज खर्चासह मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

०६. याचीकाकर्त्याने स्वतःचा पुरावा नि.क्र.०६ अन्वये दिला. याचीकाकर्त्याने शपथपत्रासोबत काही कागदपत्रे दाखल केली आहेत. ती पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | दस्तऐवज | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | उत्तरवादीला पाठविलेली नोटीस | ०७ |
| २ | पोस्ट पावती | ०८ |
| ३ | पोच पावती | ०९ |

याचीकाकर्त्याने नि.क्र.१२ वरील पुरसिस द्वारे त्याचा पुरावा बंद केला.

### मुद्दे क्र.१ व २ बाबतः-

०७. याचीकाकर्त्याने शपथेवर कथन केले की, विवाहानंतर उत्तरवादी हीने याचिकाकर्ता याच्या आईवडिलांसोबत सतत भांडण करणे, तासनतास माहेरी फोनवर

बोलणे, घरातील कामांकडे दुर्लक्ष करणे असे प्रकार करण्यास सुरुवात केली. कित्येकदा ती काहीही न सांगता ती माहेरी निघुन जायची. दि.०६/०३/२०२२ रोजी उत्तरवादी ही तिच्या आईवडिलांच्या सांगण्यावरुन माहेरी निघुन गेली. त्यानंतर ती कधीही नांदण्याकरीता आली नाही. यायाचीकाकर्ता व त्याच्या कुटुंबियांनी तिला नांदविण्यासाठी बरेच प्रयत्न केले परंतु उत्तरवादीने नांदण्यास टाळाटाळ केली. दि.२७/०९/२०२२ रोजी वकीलामार्फत नांदण्याकरीता नोटीस पाठवून देखील उत्तरवादी नांदण्यास आली नाही तसेच तिने नोटीसला उत्तरही दिले नाही. याचिकाकर्ता याला उत्तरवादीसोबत संसार करण्याची मनापासुन ईच्छा असल्यामुळे नाईलाजास्तव त्याला उत्तरवादीला नांदविण्याकरीता सदर याचिका दाखल करावी लागली.

०८. उत्तरवादी ही गैरहजर असल्यामुळे याचिकाकर्त्याचा सदर पुरावा अबाधित राहीला. उत्तरवादी गैरहजर राहील्यामुळे याचिकाकर्त्याचा उलटतपास घेण्यात आलेला नाही व त्याच्या पुराव्यातील कथने अबाधित राहीलेली आहेत.

०९. याचीकाकर्त्याचा तोंडी पुरावा तसेच दाखल कागदपत्रांवरून असे स्पष्ट होते की, उत्तरवादी ही कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना विनाकारण आपले माहेरी राहत आहे व याचीकाकर्ता याला संसार सुखापासून वंचित ठेवलेले आहे. याचीकाकर्ता याने वारंवार उत्तरवादी हिला नांदण्याकरीता आणण्याबाबत प्रयत्न केले परंतु त्या प्रयत्नांना उत्तरवादी हिने कोणताही प्रतिसाद दिला नाही, ही याचिकाकर्त्याच्या पुराव्यातील बाब अबाधित राहीलेली आहे. तसेच परित्याग करण्यास सुयोग्य कारण आहे हि बाब सिध्द करण्याची जबाबदारी उत्तरवादीवर असुन देखील उत्तरवादीने कोणताही पुरावा दाखल केला नाही व मुळ अर्जाला जबाबही दिलेला नाही. एकंदरीत दाखल पुराव्याअंती याचीकाकर्ता यास विवाह संबंध पुनर्स्थापनेची वास्तविक इच्छा असल्याचे सिध्द होते. तसेच याचीकाकर्ताच्या पुराव्यातील अबाधित कथनानुसार उत्तरवादीने कोणत्याही सबळ अथवा रास्त कारणशिवाय याचीकाकर्ता याला वैवाहिक सहजिवनापासून दूर ठेवल्याचे निष्पन्न होते . त्यामुळे मी मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी देवुन मुद्दा क्र.३ चे अनुषंगाने

खालील प्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे.

**<u>अंतिम आदेश</u>**

१. अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. उत्तरवादी सौ.प्रिया संदिप राऊत हिला असे निर्देशीत करण्यात येते की, तिने याचीकाकर्ता संदिप प्रकाश राऊत यांच्यासोबत वैवाहिक जीवन पुनर्स्थापित करावे.

३. या न्यायनिर्णयाची प्रत याचिकाकर्त्यास हिंदू विवाह अधिनियम १९५५ कलम २३ (४)अन्वये मोफत देण्यात यावी.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

Digitally signed by GULSHAN RUSHIJI KOLTE
Date: 2024.08.21 11:32:31 +0530

(**जी. आर. कोलते**)
सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर),
<u>यवतमाळ</u>.

दि.१४/०८/२०२४